९८०८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २८८
REFBK-0000539
REFBK-0000539

म. ग्रं. सं. ठाणें
काव्य
नं. २४८.

॥ …गणेशायनमः ॥

डोंगरी—

# वैश्यमित्र मेळ्याची पद्य कुसुमांजली.



निळकंठ भाऊशेट गांधी
यानीं केली

आवृत्ति पहिली.

मिती श्रावण कृष्णजयंती
शके …

" विश्वंभर …

सर्व हक्क कर्त्याने …

किंमत १ आणा.

REFBK-0000539
REFBK-0000539

# विज्ञप्ति–

**अनित्यानि शरीराणि, वैभवं नैव शाश्वतम् ।**
**नित्यं सन्निहितो मृत्युः कर्तव्यो धर्मसंग्रहः ॥ १ ॥**

आपल्या परम पूज्य वैदिकधर्मामध्यें मनुष्यदेह धा करणाऱ्या अज्ञानी जीवांची, जन्म मरणादि नाना प्रकार यातनांतून मुक्तता होऊन त्यांस परमेश्वर प्राप्ती व्हावी ह्मणू मोठमोठ्या महर्षी संत विभूतींनीं, धर्म, नीति, व्यवहार सत्कर्मे, आचार विचार पुष्कळ सांगितला आहे; पर त्यांत मुख्यत्वेंकरून कर्म, उपासना आणि ज्ञान असे तीन प्रकार आहेत. किंवा ईश्वरप्राप्तीचीं हीं एकाहून एक अधिक अशीं महत्वाचीं तीन साधनें आहेत. त्यांपैकीं कर्म ह्मणजे शास्त्रसंमत नीतिशुद्ध आचरण. उपासना ह्म० ईश्वराची नामस्मरणादि नवविधा भक्ती. व ज्ञान ह्म० आपण व पर मेश्वर यांतील अंतर, व एकंदर सृष्टींतील जीव, स्थाव जंगम वस्तुमात्राचें मूळ अधिष्ठान कारण जें परब्रह्मस्वरू त्याची प्रतीति; किंवा आत्मज्ञान प्राप्ति होणें असें ह्मटले तरी चालेल. तसेंच कायीक, वाचीक मानसिक तप ह्मण तात तें हेंच होय. प्रथम ईश्वराचें प्रतिमापूजन, अर्च वंदनादि नित्य नैमित्तिक कृत्यें केल्याशिवाय चित्तशुद्धि हो नाहीं. अंतःकरण निर्मळ झाल्यावांचून सप्रेम भक्ति उपज नाहीं, व देवतेची एकनिष्ठतेनें निरंतर उपासना घडल्या स्वरूपज्ञानप्राप्ति होते. हीं तत्वें किंवा प्रपंच परमा दोन्ही संपादन करण्याचे राजमार्ग स्पष्टतेनें व्यवस्थि सांगितलें असतील तर ते आपल्या अनादि श्रेष्ठ अ

हिंदुधर्मातच आहेत. ते दाखविण्यास अन्यधर्मीयांची, व त्यांच्या अर्वाचीन धर्मतत्वांची आपणांस यत्किंचितही जरूर नाहीं. जरी हल्लींचा काळ आपल्या देशास, किंवा परिस्थिति धर्मशास्त्रास प्रतिकूल अशी झालेली आहे; तरी त्यांतूनच श्रद्धापूर्वक एकनिष्ठतेनें होईल तितकी देशसेवा, व धार्मिक क्रिया चालू ठेवणें; व त्यांस मदत करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. त्यापैकीं श्रीगणेश महोत्सव-हा अलिकडील पद्धतीचा, एक उपासनेचा व धर्म रक्षणाचा मार्ग आहे हिंदुधर्मातील जातिद्वेष, उच्चनीच भाव, विनाकारण निंदा, दुरभिमान, हल्लीं वाढत्या प्रमाणावर आहे. तो बाहिसा होऊन ऐक्य, प्रेमवृद्धि, धर्मजागृति होण्यास मोटेमोठे उत्सव, मेळे, यात्रा यांची फार फार आवश्यकता आहे. व ते उत्सव सुरू करण्याचें, प्रतिवर्षी नियमानें चालविण्याचें अवघड कार्य जे आपल्या शिरावर घेतात, त्या सत्पुरुषांस धन्यवाद देणें हेंही त्या पैकींच एक कर्तव्य समजलें पाहिजे. आतां गणपतीच्या मेळ्याविरुद्ध कांहीं लोक जरी अद्याप थोडी कुरकुर करीत असतील, कीं विनाकारण खर्च, मुलांस त्रास जागरणें यांस कांहीं अर्थ नाहीं; तर अशा मनुष्यांस मूळ धर्मश्रद्धा, ईश्वर भक्ती, प्रेम या पवित्र मनोवृत्तींची ओळख नाहीं असेंच म्हणावें लागेल. असो. या विषयीं जास्त चर्चा करण्यास हें पुस्तक समर्थ नाहीं. ही श्रीगजाननाची नूतन पद्यकुसुमांजली त्याच्याच पवित्र चरणकमली अर्पण करितों.

हा निर्मळ हेतु किंवा स्फूर्ति उत्पन्न होण्यास कारण, माझे प्रिय सुहृद ज्ञातिबांधव, ज्यांनीं ही पद्यें तयार करण्याविषयीं मला अत्याग्रहाची सूचना केली, त्या डोंगरी वैश्यमित्र

मेळ्याचे उत्पादक व त्यांस साहाय्यकारी वैश्यमित्र मेळ्यां तील सर्व मंडळी यांचा मी अत्यंत आभारी आहें. ही वेडीवांकडी मातृभाषेची अल्प सेवा, विद्वान रसिक सज्जनांपुढें करण्याचा, माझा पहिलाच प्रयत्न आहे. मी एक अज्ञ प्राकृत मनुष्य संस्कृतभाषानभिज्ञ आहे. वेळ थोडा, प्रापंचिक व्यवहार फार, अशा घाईत क्वचित् भाषादोष असल्यास कविजन, क्षमा करतील अशी आशा धरून व यांतील नीति बोधाचा अंशमात्र सुगंध येऊन अतं:करण आनंदित झाल्यास, हें पुस्तक प्रसिद्ध केल्याचें श्रेय मिळालें असें मानितां येईल श्रीगणेशदेवता सर्व विघ्नांचा नाश करून भक्तजनांस अभिष्टवरदात्री होईल. असा पूर्ण भरंवसा बाळगून ही विज्ञापना संपवितों.

---

**पत्ता—**
केळेवाडी धोन्याचीचाळ
गिरगांव—मुंबई.
ता. ६।१।०९.

विद्वानांचा नम्र सेवक—
**निळकंठ भाऊशेट गांधी.**
रा० बागमांडलें.

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# मेळ्याचीं पद्यें.

५३०

## ॥ मंगलाचरण ॥

पद १ लें. ( चाल—स्तवुं मंगल गजमुख. )

करुं वंदन अधिं शंकर कुमरा । सुख कारक पंथ नसे दुसरा । आआ आआ ऽऽ० ॥ धृ० ॥ धर्म अवन करि सुजनोद्धारा । दुष्कृतिमल खळजन संव्हारा । युगायुगीं संभव अवधारा । हरण करित भारतभूभारा । वचनामृत हें कधिं नच विसरा । आआ आआऽऽ० ॥ करुं वंदन० ॥ १ ॥

पद २ रें. ( चाल-जगिं आशेचा पिता. )

श्रीशंकर तनयाचें चिंतन, शुद्ध मनानें आधिं करा । दुस्तर या भवसागरिं मनुजा, मार्ग दिसेना अन्य खरा ॥ धृ० ॥ काळ भयंकर घोर पातला, देशाला या आलि जरा । दुष्ट व्यसनीं भ्रष्ट जाहले, लोक लागले कुविचारा ॥ १ ॥ सुधारणा करितसां कशाची, बुधहो नीतिपथें विचरा । तत्त्व मुख्य तें हेंचि कळेना, स्वधर्मि दृढ विश्वास धरा ॥ २ ॥ होउनि गेले थोर महात्मे, शोभविली भारतीधरा । स्मरण करुनि त्या संत जनांचें, देहाचें सार्थक्य करा ॥ ३ ॥

पद ३ रें. ( चाल—जाऊं कामाला, चलाग. )

जय गणराज वदा, सदा तो । जय गणराज वदा ॥ धृ० ॥ ज्याच्या स्मरणें हरती विघ्नें, दूर होत विपदा ॥ सर्वही ॥

दूर होत विपदा ॥ सदा तो० ॥ १ ॥ पाशांकुशधर लंबोदर प्रभु, भक्तजना सुखदा ॥ निरंतर ॥ भक्त० ॥ सदा तो० ॥ २ ॥ विद्यालक्ष्मी वैभव देइल, ध्यातां नित्य पदा ॥ ॥ तयाच्या ॥ ध्यातां० ॥ सदातो० ॥ ३ ॥ नीलग्रीवा तोषवि संतत, मर्दुनि असुर मदा ॥ भयंकर ॥ मर्दुनि असुर० ॥ सदातो० ॥ ४ ॥

पद ४ थें. ( चाल-अंकित पदांबुजांची दासी. )

गणपति पदांबुजा मनिं ध्याऊं । स्वमन सुमन हें वाहुं ॥धृ०॥ ध्यातां निशिदिनीं शिवतनयाला । सुगती सन्मुख होउं ॥ गणपति० ॥ १ ॥ स्वकार्य तत्पर होतां सर्वही । परतीरावर जाउं ॥ गण० ॥ २ ॥ भीती शंका सोडुनि अवघी । प्राप्त संकटें साहुं ॥ गण० ॥ ३ ॥ सत्कर्माचें फल या लोकीं । सत्वर आपण पाहुं ॥ गण० ॥ ४ ॥ पूर्ण भरंवसा धरुनी प्रभुचा तद्यश आपण गाउं ॥ गण० ॥ ५ ॥

## शारदा-स्तवन.

पद ५ वें. ( चाल— भ्रू धनुष्य वक्र करुनि. )

ब्रह्मकुमरि वाग्देवी, हे अंबे शारदे । अज्ञ शिशू नमित चरणिं, शरण दासकामदे ॥ धृ० ॥ कुंदकुसुम धवलहार, श्वेतवसन शोभलें । सुस्वर वीणारव करि, करमंडित जाहले ॥ १ ॥ इंदुवदन मंदहास्य, कमलनेत्र साजिरे । अमृत-ध्वनिगायनिं, गंधर्वमनोमद जिरे ॥ २ ॥ अग्रभागिं अति-सुंदर, मयुर उभा राहिला । लखलखीत चपलायुत,

नीलमेघ पातला ॥ ३ ॥ वर्णु काय मंदमती, मूक होति बृहस्पति । तव वरदें पंगूजन, थोर गिरी लंघिती ॥ ४ ॥ नीलग्रिव विनवितसे, सुरदेवी सरस्वती । भक्तबुद्धिजाड्य-नाश, करीं देइ सन्मती ॥ ब्रह्मकुमरि० ॥ ५ ॥

## विभूति-स्मरण.

---

पद ६ वें. ( चाल—अर्पिलें सुमन हें. )

प्रभु करा कृपा या भरत भूमिवरि आतां । स्वातंत्र्य कधीं इस देतां । तुजविणें दयाघन त्राता ॥ लोकीं, दिसेना, सुका-र्यकारी तत्त्वतां ॥ प्रभु करा० ॥ १ ॥ धृ० ॥ ( चाल ) धर्मशील ते थोर तपस्वी, व्यासादिक मुनि कोठें । नारद वाल्मिक वशिष्ठ शुक जे ब्रह्मज्ञानी मोठे ॥ प्रभु करा० ॥ १ ॥ हरिश्चंद्र नलराज युधिष्ठिर रामराय अमुचे । सत्त्वधीर बहु विक्रमशाली, नरपुंगव साचे ॥ प्रभु० ॥ २ ॥ गुरु शंक-राचार्य समर्थही, छत्रपती महाराज । शिवाजी बाजीराय गर्जती, ज्यांची नामें आज ॥ प्रभु० ॥ ३ ॥ स्वदेश ज्यांसी प्राणप्रिय अति, स्वराज्य स्थापनीं देह । झिजवुनि हिंदुधर्म्म रक्षिती, प्रजापालनीं स्नेह ॥ प्रभु० ॥ ४ ॥ त्रिभुवनिं कीर्ति प्रसृत सांप्रत, राष्ट्रतिलक नरसिंह । असुनि पंजरीं पडला जैसा, कानतगामी सिंह ॥ प्रभु० ॥ ५ ॥ गंगाधर-तनयावरि सदया, पूर्ण कृपाकर ठेवा । असे महात्मे बाल-स्वरुपी, जन्मावे देवा ॥ प्रभु करा कृपा० ॥ ६ ॥

## स्वदेशीवर.

पद ७ वें. ( चाल—नृप तनयेवर हें मन. )

आर्यबंधु हो, एकमतानें, झटा स्वदेशी कार्याला ।
परदेशी वस्तू टाकुनि द्या, भुलूं नका सौंदर्याला ॥ धृ० ॥
खिसा रिकामा झाला तरिकां उमज पडेना चित्ताला । कलह द्वेषा, स्वगृहिं थारा, करुनि भिकारी तुह्मिं बनलां ॥

( चाल )—देशबंधुहो । करुनियां त्वरा ॥
उद्यमीं सदा । धैर्य मनिं धरा ॥
राष्ट्रजनमता । मान तत्वतां ॥
लेशही नसे । आस मुळीं आतां ॥
( चाल )—शिवकुमरा । नित्य स्मरा ॥ आर्यबंधुहो० ॥१॥

## टिळक-स्मृति.

पद ८ वें. ( चाल-मूर्तिमंत भीति उभी. )

कीर्तिवंत लोकाग्रणी, टिळक मूर्ति मनीं वसे । सत्वधीर नयशाली, गुणसागर जो असे ॥ धृ० ॥ बंदिवास तापद हा, केंवि भोगणें सरे । नयन सजल होत दुःख-नदा पूर येतसे ॥ कीर्तिवंत० ॥ १ ॥ धैर्याचा मेरुच कीं, तेजस्वी दिनमणी । इंद्रचि कीं सुरगुरु हा, अवतरला नरमणी । नक्षत्राधीपति हा, चंद्रचि शोभे अवनी ॥ सुत प्रसवे धन्या जगीं, मायभूमि होतसे ॥ कीर्तिवंत० ॥ २ ॥ रामदूत अंगद कीं, रावणदर्पास हरी । शिष्टाई कुरुसभेंत, करि

पांडवहितकारी ॥ शिवराजा भानुवंशि—नाना हा अवतारी ॥
गणराया गंगाधर—बाळा चिरसौख्य करी ॥ विनति चरणिं
अन्य नसे, हेंच लागलें पिसें ॥ कीर्तिवंत० ॥ ३ ॥

## सुधारक धार्मिक संवाद—

---

पद ९ वें. ( चाल—परि शिवा न लावी. )

सुधारक—किति मूर्ख दिसति हे जन मजला । कां व्यर्थ
काळ गमविति अपुला ॥ ध्रु० ॥
धार्मिक—कांहो पंडित विपरित वदतां, शंकित मन झालें ।
कां भ्रम झाला, तुमच्या मतिला ॥ १ ॥
सुधा०—देवभक्ति ही करितां कसली ? धर्म नव्हे हा त्रास ।
धार्मि०—परकीयांची संगति जडली, तिनें लाविला फांस ॥
कां भ्रम झाला० ॥ किति मूर्ख० ॥ २ ॥
सु०—पाप कशाचें,पुण्य कशाचें । कुणी पाहिलें शिंग सशाचें ॥
धा०—धर्म भ्रष्ट कुविचारि अशांचें । वर्तन शुद्ध घडेचि
न साचें ॥ ज्ञान न हें पाखांड ॥ कां भ्रम० ॥
किति मूर्ख० ॥ ३ ॥
सु०—खावें प्यावें चैन करावी, पुनर्जन्म सब झूट ।
धा०—प्रसंग मृत्यू जोंवरि नाहीं, मनःपूत सुख लूट ॥
कांभ्रम झाला० ॥ किति मूर्ख० ॥ ४ ॥
सु०—पुराण शास्त्रें अवघीं खोटीं, आत्मरक्षि तो धर्म्म ।
धा०—स्वार्थापुरतें बोलसि वचना, सत्य कळेना वर्म्म ॥
कांभ्रम झाला० ॥ किती मूर्ख० ॥ ५ ॥

सु०—मर्मज्ञानी शहाणे तुमचा, मार्ग कोणता सांगा साचा, टाइम इजाधि मनी । ठेट फाराचि झाला ॥ किति मूर्ख० ॥ कांभ्रम० ॥ ६ ॥

धा०—वेदश्रुतिवरि ठेवुनि श्रद्धा। भगवद्गीता जगतिं प्रसिद्धा। व्यास तुकोबा संतवच सदा ॥ बुधजन संघ भला। रस घेतचि आला ॥ कांभ्रम झाला० ॥ किति मूर्ख० ॥ ७ ॥

धा०—दुर्जनसंगाति सोडुनि दुर्मति। ईश्वरभक्ती साराचि जगतीं। तारिच अविद्या मोह निरसती। नाम स्मरण करा सुखशांतीस वरा ॥ कां भ्रम० ॥ ८ ॥

सुधारक—सारासार विवेक मन्मनीं। प्रकाश केला वचनें बोधुनी। शरण सद्गुरू मी अज्ञानीं। पदरीं घ्या मजला। बहु आनंद झाला ॥ बहु सूज्ञ गमति हे जन मजला ॥ गणराज उत्सवा करित चला ॥९॥

## मद्यपान–निषेध.

---

पद १० वें ( चाल—नृपममता रामावरती. )

जगतिं या कली संचरला। जणु मद्यरुपें अवतरला ॥ भासतो ॥ ॥ धृ० ॥ पाडुनियां मोह जनाला। दुर्गती देतसे सकलां ॥ ॥ भासतो ॥ करिं घेत सुरेचा प्याला। निःशांकित पीति विषाला ॥ मनुजहे ॥ सागरीं अंत जरि झाला। मदिरेंत बुडुनि बहु मेला ॥ जन किती ॥ ( चाल ) जाळिती, तनूही किती, द्रव्य नाशिती। मतिभ्रम झाला ॥ बडबडे पशुसम लीला ॥

 ग्रं. क्र. ५३८

॥ कितितरी ॥ जगतिं या० ॥ १ ॥ समशेर कनक कामिनिला । आडवी भजन मार्गाला ॥ मानिती ॥ मायेची नाटकशाला । दुर्व्यसनें करिती हल्ला ॥ मारिती ॥ नाण्याचा दुकाळ पडला ॥ घरिं रडे सवत्सा अबला ॥ सुंदरी ॥ ( चाल ) अयदशा, पिशाची अशा, किती वदुं तशा । मूर्ख श्वानाला ॥ सर्वांग मलिन जो बनला ॥ दुर्मुखी ॥ जगतिं० ॥ २ ॥ मित्रहो प्रार्थितों सकलां । तुह्मि नका शिवूं मद्याला ॥ बंधुहो ॥ कारण हें अपकीर्तीला । मुळ असे सर्व नाशाला ॥ बंधुहो ॥ यापेक्षां दुग्धसुधेला । प्राशितां देत पुष्टीला ॥ अमृत हें ॥ ( चाल ) मनिं धरा, निंद्य ही सुरा, द्रव्य परतिरा । नेत देशाला । अन्य देशाला ॥ श्रीमंत बनविलें त्यांला ॥ आजवरी ॥ जगतिं० ॥ ३ ॥ रात्रंदिन वपु कष्टवितां । किति त्रास धना मेळवितां ॥ सुजनहो ॥ दारुडी बनुनि घालवितां । मृत्तिका पदारिं बांधीतां ॥ सुजनहो ॥ बहुमोल जन्म ये हाता । आयुष्य नाश कां करितां ॥ सुजनहो ॥ ( चाल ) गणपती, शुद्ध दे मती, भक्त तुज गाती । धांव हांकेला. ॥ तुजविणें प्रार्थु कवणाला ॥ मोरया ॥ मोरया० ॥ जगतिं या० ॥४॥

## पदें हिंदुस्थानी.

( पद १ लें. चाल–शिवसुता भजावें. )

भाइ चलो जरा हमको जाने देव ॥ रस्ता छोडो जरा हमको जाने देव ॥ धृ० ॥ दर्शन प्रभुका होना सबको । नयननको सुख लेने देव ॥ भाई० ॥ १ ॥ थोडी देरी काम बहुत है ।

छोटे बालक आने देव ॥ २ ॥ तसादि हमारी क्षमा करो जी । कृपा सभीपर होने देव ॥ ३ ॥

( पद २ रें. हिंदुस्थानी चाल— जनसारे मजला. )

भाइ ऐसि घडी नहिं आनेका । गजमुख दर्शन पानेकी ॥ ॥ धृ० ॥ आज हमारा भाग्योदय है । गणपति उत्सव रंग चला है । तुमहम सब जन एक मिले हैं । धुंद सुनो गुन गानेकी ॥ भाइ० ॥ १ ॥ कौन सुखी है यही जगतमों । राजा रंक दुखी सब मनमों । ईश्वरभक्ति बिना क्या क्षणमों । काया मट्टी होनेकी ॥ भाइ ऐसि० ॥ २ ॥

पद ११ वे. ( चाल—नागिणी चपल खल. )

हे मंगलमय गणराया । अह्मावरि कां, कोप सदया ॥ दारूण दावितां माया ॥ हे मंगल मय० ॥ धृ० ॥ विघ्नांतक तं तव गुणभजनें । निर्भय शांती पावति सुननें ॥ सिद्धि-विनायक नामस्मरणें । भक्त निरंतर गुंगति गानें ॥ तयां-वरि प्रसन्न व्हा वर द्याया ॥ अह्मावरि कां० ॥ हे मंगलमय० ॥ १ ॥

## काल महिमा.

पद १२ वें. ( चाल—दृष्टि भरे जलभारे. )

नागविले जन काळें ॥ आले, रिपुघाले, हरियेलें । सुख-बीज लयासी गेलें ॥ धृ० ॥ धर्म सनातन उच्च अनादी । परि निंदक खल, टोंचित हृदयीं भाले ॥ आले० ॥ १ ॥ सुवर्णभूमी नाम ऐकुनी । चकित भृंगससुदाय मधूतें झाले ॥ आले० ॥ २ ॥ सकल कलानिधि देश- दरिद्रें । व्यापित

दी. क्र. ५३९

बुधवपु, घोर भयंकर जालें ॥ आले० ॥ ३ ॥ सार्वभौम नृपती कातिरत्न । संत महंतहि, ईश्वरें पुरुष निमाले ॥ आले० ॥ ४ ॥ नमस्कार त्या यमाजिपंतां ॥ कालचक्र उदयास्ता पुढती, गर्व कुणाचा चाले ॥ आले० ॥ नागविले. ॥५॥

## जगाची-स्थिति.

पद १३ वें. ( चाल-वारी जाउंरे सांवरिया. )

भवसागर, सुंदर, अतितर, सुखकर सत्य नोहे ॥ भासत ॥ सत्य नोहे ॥ ध्रु० ॥ कर्णमधुर वाद्यें संगीतें । श्रवणिं पडति कधिं शोककर ते ॥ जनन मरण, किति चंचल, चित्तहि वित्त आहे ॥ भवसागर० ॥ १ ॥ विद्वज्जन संवाद गितेवरी । कुठे मद्यपी कलहें नगरी ॥ खलजन मौजा चालति, सज्जन दुःख साहे ॥ २ ॥ रम्य मनोहर देवदर्शना । पंथीं कुष्टी गलितवपु जना ॥ नयनविहिन अति दुःसह, पीडित काय पाहे ॥ ३ ॥ सुख दुःखाचें मिश्रण यापरी । अमृतचि किंवा विष संसारीं ॥ समजुनि श्रीहरि स्मरणें अंतरिं शांत राहे ॥ भवसागर० ॥ ४ ॥

## प्रार्थना.

पद १४ वें. ( चाल—अशिकशि हरी जवळ उभिराधा. )

प्रभु नरहरी जनक सकळांचा, विसंब अमुचा कसा करी । निसंग झाला ह्मणूं तरी ॥ मन किति दयाळ । नतजन कृपाळ । असुरां जो तत्काळ रूपें धरी ॥ ( चाल ) दीन आम्ही तीरू कोटी, क्षुद्र पशुसम मानिती । मायभूमी

गाय तैशी, अनाथ समजुनी तोडिती ॥ जलांत, स्थलांत, खांबांत, वस्तूंत, नाहींच कैसा झाला हरी ॥ प्रभु० ॥ ॥ १ ॥ दिसत कर्मे सर्व तुजला, सर्वसाक्षी सगुण तूं। सूर्यचंद्रा नयन ऐसे, काय निर्गुण होशि तूं ? ॥ जगांत, देशांत, सर्वांत, पतित, उद्धार तुजविण कोणी करी ॥ प्रभु० ॥ २ ॥

पद १५ वें. ( चाल—हे सदय हृदय यदुराया. )

हे मंगलरुप गणराया । वंदी, पायां, आतां, सदया । या दीनजना ताराया ॥ धृ० ॥ पारतंत्र्यंता बहु दुःख करी । मनिं भारी, संसारीं, अद्यावरी, करा दया ॥ हे मंगल० ॥ ॥ १ ॥ धूर्त नीच कपटी । स्वार्थासाठीं । करिति खटपटी । बारे ॥ सर्प बरा परि । दुर्जन वैखरि । नित्य जाळि सज्जन-काया ॥ हे मंगल० ॥ २ ॥

पद १६ वें. ( चाल—जन खुळावले. )

सुख कसें मिळे । जना, सुख० ॥ नित्य तळमळेSSSS ॥ ॥ धृ० ॥ अन्यधर्मि मन रमलें । दुर्मति विष नच शमलें । काय कथुनि बहु भाषण, सत्य नाकळे ॥ सुख० ॥ १ ॥ धर्मशास्त्रमर्यादा । सद्वर्तन धरिति तदा । कलीकाल महा-दुःख, सत्वरी पळे ॥ सुख० ॥ २ ॥ अनावृष्टि भूवरती । महारोग कां छळिती । कारण या पाप फार, हृदयिं खळबळे ॥ सुख० ॥ ३ ॥ साधु संत महामुनी । दुष्ट इंद्रिय गण दमुनी । ज्ञानामृत वर्षियलें, पीत जा बळें ॥ सुख० ॥ ४ ॥ भो दयाळ विघ्नहरा । अपराधा क्षमा करा । कृपादृष्टि सतत ठेविं, न धरिं आगळें ॥ सुख० ॥ ५ ॥

## पूर्वजस्मरण.

पद १७ वें. ( चाल—जागृत ठेवा लग्नाची. )

सादृश देवा सारिखे, पूर्वज आणा मनीं । सार्थक मानवदेह केला । कीर्ति गाजत पुराणीं ॥ धृ० ॥ किति शूर साहसी, धैर्यवंत सद्गुणी । नीतिवंत कसे, पुण्यवान नरमणी ॥ थोरवंशीं जन्मुनि ऐशा, करितां आत्महानी ॥ सादृश० ॥१॥ ( चाळ ) आश्रमवासी उग्र पतस्वी, कंदफलाहारी । वेदाभ्यासी भूदेवाचि, सांप्रत कुविचारी ॥ नीचसेवा अंगिकारिती, धना स्वहित मानुनी ॥ २ ॥ पराक्रमी जे प्रजाधिकारी, तेजस्वी राजे । वंशज नामें केवळ संज्ञा, बुद्धिबळी साजे ॥ विषयभोगा भोगिति सौख्या, दैवशालि समजुनी ॥ ३ ॥ उर्ध्वभाग हे मुख्य शरीरीं, धर्महीन झाले । केंवि टिके मग अर्धांगचि तें, दीनरूप बनले ॥ धर्मनीति शून्य पडे । वालि नाहिं ह्मणवुनी ॥ सादृश० ॥ ४ ॥

## शिवाजी—वर्णन.

पद १८ वें. ( चाल—धन्य जाहलों, तुझी राम. )

धन्य शिवाजी, नृपराय शिवाजी ॥ माझा, राय शिवाजी ॥ गेला, राय शिवाजी ॥ धृ० ॥ यवन विनाशक, अतुलप्रतापी । गाई ब्राह्मण रक्षक वापी ॥ जीवन शिवाजी ॥ गेला० ॥ १ ॥ खलजन पीडित, भरत भुमीतें । करि मोचन स्वजनं हातें ॥ तारक शिवाजी ॥ गेला० ॥ २ ॥ परकिय सेवन, विषसम मानी । हिंदुधर्माचा अभिमानी ॥ भुवन

शिवाजी ॥ गेला० ॥ ३ ॥ उदयगिरी जो, क्षात्रिय तेजा । महाराष्ट्रीय जन समाजा ॥ भास्कर शिवाजी ॥ गेला० ॥४॥ चतुर शिरोमणी, राज्य नियामक । दिल्लीपतिसहि वाटे धाक ॥ शुरवीर शिवाजी ॥ गेला० ॥ ५ ॥ असुरसमूहा, अंतक देवी । शिव रूपाचि प्रखर दावी । भीम शिवाजी ॥ गेला० ॥ ६ ॥ तात प्रजेसी, पुत्रचि मानी । थोर उदार सुगुण खाणी ॥ वर्णु काय शिवाजी ॥ गेला० ॥ ७ ॥ हलधर मावळे मित्र मराठे । प्राणाहुनिहि प्रिय मोठे ॥ आत्मा शिवाजी ॥ गेला० ॥ ८ ॥ देश उद्धारक बहु वीर झाले । जगीं यासम कोणी न तोले ॥ नीतिमान शिवाजी ॥ गेला० ॥ ९ ॥ शंकरावतारी, स्वातंत्र्य मूर्ती ॥ ख्याति गर्जे त्रिजगतीं ॥ महात्मा शिवाजी ॥ गेला० ॥ १० ॥ रामदास सद्गुरू, वशिष्ठचि स्वामी । कार्यभाग केला नामी ॥ रामराय शिवाजी ॥ गेला० ॥ ११ ॥ पुनरपि देवा, दाखवि डोळां । धन्य भाग्य मानूं वेळा ॥ विजयि शिवाजी ॥ गेला० ॥ धन्य शिवाजी० ॥ १२ ॥

## विद्येचें-महत्व.

---

पद १९ वें. ( चाल—वीर शिरोमणि सकल. )

वैश्यमित्र हो एक प्रार्थना, विद्याधन मेळवा । सुबुद्धि ज्ञान मनीं खेळवा ॥ धृ० ॥ सर्व धनाहुनि श्रेष्ठ अशी ही, प्राप्त होइ जेधवां । योग्यता वाढे जगिं तेधवां ॥ कामधेनु ही अमृतधारा, कल्पतरू जाहली । उपमा सत्य कवीनीं दिली ॥ त्रिलोक चिंतामणि कीं मात्रा, दिव्य वह्नि ही असे । तिमिर अज्ञा

घालवीतसे ॥ ( चाल ) ही प्रगट दिसेना, गुप्त ठेव अन्याला । दिधल्यास दुणावे, सौख्य देइ सकळांला । कधिं नाश न पावे, भूषविते मनुजाला ॥ प्रशंसिली किति ग्रंथीं विद्या-विहिन पशु मानवा । बोलती अर्थ नसे हा नवा ॥ वैश्य-मित्रहो० ॥ १ ॥ पश्चिम देशीं युरोपवासी, व्यापारी कंपनी । आज ती महाराज्य स्वामिनी ॥ सार्वभौमिनी सत्ताधारी, हिंदुस्थानावरी । गाजवी अम्मल खुप चातुरी ॥ अमेरिका पातालवासि ते कोट्याधिश जाहले । जर्मनी लोक पुढें चालले ॥ (चाल) मुळ उद्योगाचें, बळ विद्या सर्वथा । ज्ञानाविण शक्ती, जात पहा अन्यथा । गज थोर खरा परि, अंकुशमात्रें वृथा ॥ होत व्याघ्रसिंहादि पराक्रम, सरकशींत वानवा । मानवी बुद्धि किती अभिनवा ॥ २ ॥ जुन्या चीनला मार्गे सारुनी, पूर्व दिशे राहिला । जपानी सूर्य उदय पावला ॥ अफाट रशिया देश ज्यापुढें, शौर्यहीन जाहला । जयश्री माळ जपानी गळां ॥ लहान मूर्ती मोठी कीर्ती, इंग्लंडहि तो भला ॥ जपानी स्तोत्र गाउं लागला ॥ ( चाल ) आगगाडी तारायंत्रें, माग आलीं । नित्य नव्या कल्पना, चढाओढ चालली । आकाश विमानें, चालविती या काळीं । टॉर्पेडोनीं बोटि फोडिती, पाण्यांतुनि आघवा । रस्ता युद्धकलेचा नवा ॥ ॥ ३ ॥ विद्वानांची सर्वत्र पुजा, होते देशांतरीं । स्वदेशीं राजा मानिती तरी ॥ किर्ति होतसे विद्वत्तेची, स्वदेशसेवा खरी । करी जो त्यास तारि तो हरी ॥ वृद्ध पितामह दादाभाई, सुरेंद्रबाबू भले । काया वाचा मन वाहिलें ॥ ( चाल )

कैलासनिवासी, शास्त्री चिपळुणकर । महाराष्ट्र पुण्याचें, रत्नचि गेलें हरहर ! ! । केसरीकार विद्येचं प्रोफेसर । निबंधमाला लेखन शैली, भाषेची माधुरी । घेइ त्या तोषवील अंतरीं॥ ॥ ४ ॥ स्वामि विवेकानंद जयांचे, शिष्य गेले होउनी । स्मरा ते रामकृष्ण सन्मुनी ॥ प्रभाव ज्यांच्या वेदांताचा, परदेशीं जाहला । स्थापिती अमेरिकेत मठाला ॥ गीताभक्त बंगाली सोशिती, त्रास किती दुर्धर । तत्त्व तें कर्मयोग खरोखर ॥ ( चाल ) अरविंद घोष बहु, शांत मनें राहती । पालबाबू साक्षी, स्वमन विरुद्ध न देती । लाल पंजाबांतिल, परोपकारी अती । बाळ तिलक बंदींत एकांतीं, आयुष्या कंठिती । धैर्य नच ज्ञानाविण लाधती ॥ ५ ॥ देह त्यागितां कीर्ति उरावी, मागें ज्या वाटते । तेच नर क्रियाशुद्ध जाणते ॥ श्वान सुकर योनीमधें गणती, जीवांची ती नसे । असंख्यचि जन्ममृत्यु होतसे ॥ ज्ञानरूप ही ईश्वरशक्ती मानव जन्मीं असे । त्याविणें व्यर्थ आयु जातसे ॥ ( चाल ) यासाठीं सुविद्या—प्रदीप हातीं धरा । मग मार्ग सुलभ अति सुंदर दिसतो खरा । आनंद शांति सुख चालत येतें घरा । श्रीविद्याधरपति वाग्देवी चरणीं विज्ञापना । सुबुद्धी द्यावी अमुच्या जनां ॥ वैश्यमित्रहो० ॥ ६ ॥

॥ श्रीहरिस्मरण ॥

---

पद २० वें. ( चाल—राम स्मरावा राम. )

श्री विठ्ठल सुखधाम । स्मरा मनीं ॥ श्री विठ्ठल० ॥ धृ०॥
कर ठेवुनि कटीं भक्तासाठीं, भीमातिरीं जो ठाम ॥ स्मरा० ॥
त्यागुनि संसृतिमोह मुखीं धरी, रामकृष्ण हरिनाम ॥स्मरा०॥

कामादिक षड्रिपु अधिकारी, नाशिती देहग्राम ॥ स्मरा० ॥
बंधन मोक्षा कारण मन हें, विवेक जागृत धाम ॥ स्मरा० ॥
सुवर्ण कांता पुत्र सर्वही, अंतीं होत निकाम ॥ स्मरा० ॥ जनन-
मरण माया मोहातें, हरितें माधव नाम ॥स्मरा०॥ भक्त उपेक्षा
कधिं नच करि तो, नारायण घनश्याम ॥ स्मरा० ॥ कृपावंत
प्रभु दीन दयाळु, व्यापक आत्माराम ॥ स्मरा० ॥ ज्ञानदेव
तुकयादिक तरले, सोडुनि सर्वहि काम ॥ स्मरा० ॥ पंढरि-
नाथा पतित पावना, त्वत्पदिं दे विश्राम ॥ स्मरा० ॥
श्री विठ्ठल सुखधाम० ॥ १ ॥

## शेवटचें ईशस्तवन.

( चाल—सुंदरमुखतुंदिल० )

वक्रतुंड हेरंबा गौरिनंदना । विघ्नांतक हे गणेश मुषक-
वाहना ॥ धृ० ॥ सिंदुरारि तुंदिल तनु, दुरितनाशना ।
विघ्नराज मोरेश्वर दैत्यकंदना । पाशांकुश धृतपरशू, दुःख-
भंजना ॥ सदया । माया । विलया ॥ न्या दूरा । तिमिर हरा ।
सूज्ञ करा ॥ भो शुभानना ॥ १ ॥ भवसागर अति दुस्तर ,
सुमति दे मना । वृष्टि योग्य काळिं धान्य वृद्धि गोधना ॥
रोग व्याधि पीडित बहु, शांतवी जनां ॥ कर्ता । हर्ता । दाता ॥
जगदीशा । भयनाशा । करि दासा । पूर्ण पावना ॥ २ ॥
आर्यभूमि गोमाता, त्रस्त ही अती । देशभक्त पुत्र तिचे, दुःख
सोसिती । विघ्ननाश करि मुक्ति, दे सुखाप्रती ॥ धांवा । पावा
देवा वर द्यावा । निजग्रीवा । पार भरा ॥ न्या गजानना ॥३॥

समाप्त.

५३९

# वुड एन्ग्रेव्हिंग

( लांकडारील कोरींव काम )

येथें नाहीं यंत्रक्रिया रसायन । नाहीं तंत्र मंत्र औषधी प्रधान । ही केवळ देशी हस्तकला जाण । प्रत्यक्ष प्रमाण पहावें ॥ १ ॥

आमचेकडे सर्व ग्रंथांतील चित्रें, फोटो, निरनिराळ्या वस्तूंचे क्याटलॉग, जाहिरातींचे नमुने, उत्तम लांकडावर इंग्लिश तऱ्हेप्रमाणें सुरेख एन्ग्रेव्हिंग करून दिले जातात. करितां सर्व देशबांधव, लहानमोठे कारखानदार, मुद्रणयंत्राधिपति, विद्वान लेखक, बुकसेलर्स, कला शोधक, पत्रकार व्यापारी वगैरे सद्‌गृहस्थानीं अनुभव घ्यावा. योग्य किमतीस नेमल्यावेळीं उत्तम काम करून देऊं.

एन्. बी गांधी.

चाळ--गिरगांव--मुंबई.

काराम पुंडलीक शेट्ये

बुकसेलर्स, माधवबाग--मुंबई.

चे विऱ्हाडी व इतर बुकसेलर्सकडेहि मिळू शकतील.


REFBK-0000539
REFBK-0000539